शासनाचा माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये लोकप्राधिकारी यांची यादी
दिनांक 13 मार्च 2015 अखेर अदयावत

कलम **4 (1) (**ख) (एक)

**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथील संजय गांधी योजना शाखा** कार्यालयातील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील.

**कार्यालयाचे नाव** :- जिल्हाधिकारी कार्यालय, संजय गांधी योजना शाखा, नांदेड

**पत्ता** :- जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड .

**कार्यालय प्रमुख** :- जिल्हाधिकारी, नांदेड

**शाखा प्रमुखः-** तहसिलदार (संगांयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

**शासकिय विभागाचे नाव** :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

**कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त** :- महाराष्ट्र शासन, विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई 32

**कार्यक्षेत्र** :- जिल्हा **भौगोलीक** :- जिल्हा / कार्यानुरुप :- जिल्हास्तर

**विशिष्ठ कार्ये** :- संजय गांधी निराधार योजनेंतर्गत येणा-या अनुदानाचे तालुक्यांना वितरण व्यवस्था, खर्चमेळ घेणे आकडेवारी घेणे, त्याची माहिती शासनाकडे सादर करणे, शासनाकडे व मा. आयुक्त यांजकडे मासिक पत्रके, महालेखापाल व आयुक्त यांजकडील लेखा तपासणी/कार्यालयीन तपासणी अहवालातील लेखा आक्षेप व फरकांचे अनुपालन करुन अहवाल पाठविणे इत्यादि.

**विभागाचे ध्येय /धोरण** :- आपल्या देशात बरेच लोक दारिद्रयरेषेखाली जीवन जगत आहेत. साधारणपणे 20 टक्के लोक सर्वस्वी निराधार आहेत असे समजले जाते अशांच्या बाबतीत म्हातारपणामुळे किंवा एखाद्या गंभीर स्वरुपाच्या आजारपणामुळे किंवा दुर्धर रोगामुळे अगतिक जीवन जगत असतील त्यांना कोणाचाही आधार नसेल अशा व्यक्तींना आधार देणे.

**सर्व संबंधीत कर्मचारी** :-तहसिलदार पद 1, संजय गांधी योजना लिपीक पद –1, शिपाई पद –1 सर्व पदे भरलेली आहेत.

**कार्य/कामाचे विस्तृत स्वरुप** :- शासनाकडून आलेल्या अनुदानाचे वितरण करणे, तालुक्यांनी वापरलेल्या रकमेचा खर्चमेळ घेणे, समित्या स्थापन करणे, मासिक पत्रके, त्रैमासिक पत्रके, वार्षिक पत्रके तयार करणे तालुक्यांची माहिती शासनास सादर करणे इत्यादि.

**मालमत्तेचा तपशिल व इमारती व जागेचा तपशिल** –
उपलब्ध सेवा –
संस्थेच्या संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरावरच तपशिल –
कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक व वेळा :- 02462 –234565 , 238500 व 235077 सकाळी 10 ते 5:45

**साप्ताहिक सुट्टी व विशिष्ठ सेवेसाठी ठरवलेल्या वेळा** :-सार्वजनिक सुट्टया, व दुसरा आणि चौथा शनिवार

कलम **4 (1) (**ख) (दोन) नमुना (अ)

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील संजय गांधी योजना_कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकारांचा तपशिल.

**अ**

| अ<br>अ. क्र. | पदनाम | अधिकार - आर्थिक | कोणत्या कायद्या/नियम/ शासननिर्णय/ परिपत्रका नुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1<br><br>2<br><br>3<br><br>4 | जिल्हाधिकारी<br><br>निवासी उपजिल्हाधिकारी<br><br>तहसिलदार<br><br>लिपीक | शासनाकडून आलेले अनुदान तालुक्यांना वितरीत करणेचे आदेश मंजूर करणे, समिती स्थापन करणेचे आदेश मंजूर करणे.<br><br>हे जिल्हास्तरावर सनियंत्रित अधिकारी आहेत.<br><br>हे पर्यवेक्षण अधिकारी आहेत.<br><br>संकलनाचे संपुर्ण काम व अनुदान वितरण बाबत माहिती तयार करणे. | शासन निर्णय क्रमांक :- विसयो-2010/ प्र.क्र. 175/विसयो –2<br>दिनांक 26 ऑक्टोबर 2010 वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार<br><br>वित्तीय नियम | - |

**ब**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार –प्रशासकिय | कोणत्या कायद्या/नियम/ शासननिर्णय/ परिपत्रका नुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - |

**क**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार –फौजदारी | कोणत्या कायद्या/नियम/ शासननिर्णय/ परिपत्रका नुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - |

**ड**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार –अर्धन्यायीक | कोणत्या कायद्या/नियम/ शासननिर्णय/ परिपत्रका नुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - |

कलम **4 (1) (**ख) (दोन)    नमुना (ब)

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील संजय गांधी योजना कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कर्तव्यांचा तपशिल

| अ. क्र. | पदनाम | कर्तव्य | कोणत्या कायद्या/नियम/ शासननिर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी | हे जिल्हास्तरावर सनियंत्रित अधिकारी म्हणून काम पहातात. | | |
| 2 | निवासी उपजिल्हाधिकारी | हे जिल्हास्तरावरील संनियत्रण अधिकारी म्हणून काम पहातात. | शासन निर्णय क्रमांक :- विसयो-2010/ प्र.क्र. 175/विसयो – 2 दिनांक 26 ऑक्टोबर 2010 | |
| 3 | तहसिलदार | पर्यवक्षण अधिकारी म्हणुन काम पाहतात. | | |
| 4 | लिपीक | शासनाकडुन आलेल्या आदेशानुसार अनुदानाचे व इतर माहिती तयार करणे. | वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार | |

कलम **4 (1) (**ख) (तिन)

निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदाईत्व निश्चित करुन कार्यपध्दतीचे प्रकाशन (कामाचा प्रकार/नाव)

कामाचे स्वरूप :- संजय गांधी निराधार योजनेंतर्गत वेळोवळी शासनाकडून येणारे अनुदान तालुक्यांपर्यंत पोहोचवणे, समित्या स्थापन करणे, तालुक्यांचे खर्चमेळ आकडेवारी घेणे, ती शासनास सादर करणे इत्यादि.

संबंधीत तरतूद :- राज्य शासनाकडे केली जाते.

अधिनियमाचे नाव :- सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग,
नियम :-
शासन निर्णय :- क्रमांक :- विसयो-2010/प्र.क्र.175/विसयो-2 दिनांक 26 ऑक्टोबर 2010
परिपत्रके :-
कार्यालयीन आदेश :-

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | कालावधी दिवस | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | वेळोवेळी शासनाकडून मंजूर अनुदानाचे तालुक्यांना वितरण करणे, समित्या स्थापन करणे, तालुकावार खर्चमेळ आकडेवारी घेवून शासनास सादर करणे इत्यादि. | - | तालुकापातळीवर तहसिलदार / संजय गांधी नायब तहसिलदार | - |

टिप :- कलम 4 (1) (ख) (चार)

प्रत्येक कार्य, सेवा, कर्तव्य, अधिकाराची अंमलबजावणी करण्याकरिता अधिनियम, नियम, शासन निर्णय, परिपत्रक, आदेश यांचा आधार घेऊनच कार्यपध्दती ठरते.

प्रत्येक कार्य, सेवा, कर्तव्य, अधिकाराची अंमलबजावणी कशी होते याची पध्दती प्रकाशीत करणे यासाठी लोकप्राधिकारी माहितीचे संकलन परस्पर संबंध कार्यपध्दती ठरविण्यासाठी वर अनुनिर्देशित अटिनुसार पुर्तता करावी.

प्रत्येक कार्यपध्दतीमध्ये विविध स्तराच्या कर्मचा-यांचा सहभाग असतो. प्रत्येक कर्मचा-याची कार्यपध्दतीमध्ये जी विशिष्ट भूमिका व जबाबतदारी निश्चित करण्यात आली आहे ती दर्शविण्यात यावी.

कलम **4 (1) (**ख) (चार)  नमुना (अ)

नमुन्यामध्ये कामाचे प्रकटीकरण

संघटनाचे लक्ष (वार्षिक) उद्दीष्ट नाही.

| अ.क्र. | काम / कार्य | कामाचे प्रमाण | आर्थिक लक्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | | निरंक | --- | --- |

कलम **4 (1) (**ख) (चार)  नमुना (ब)

कामाची कालमर्यादा :-

प्रत्येक कामाची कालमर्यादा :-

| अ.क्र. | काम / कार्य | दिवस / तास पूर्ण करण्यासाठी | जबाबदार अधिकारी | तक्रार निवारण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1 | शासन निर्णय 26-10-2010 नुसार कार्यालयीन कामकाज पार पाडणे व वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार | ---- | --- | ----- |

कलम **4 (1) (**ख) (पाच)

**<u>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील संजय गांधी योजना</u>** कामाशी संबंधीत नियम/अधिनियम

| अ.क्र. | सूचना पत्रकानुसार दिलेले विषय | नियम क्रमांक व वर्षे | अभिप्राय (असल्यास) |
|---|---|---|---|
| - | निरंक | -- | -- |

कलम **4 (1) (**ख) (सहा)

**<u>जिल्हाधिकारी नांदेड येथील संजय गांधी योजना</u>** कामाशी संबंधीत शासन निर्णय

| अ.क्र. | शासन निर्णयानुसार दिलेले विषय | शासन निर्णय क्रमांक व तारीख | अभिप्राय (असल्यास) |
|---|---|---|---|
| - | -- | शासन निर्णय क्रमांक :- विसयो-2010/ प्र.क्र. 175/विसयो –2 दिनांक 26 ऑक्टोबर 2010 वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार | योजना तालुकापातळीवर राबविल्या जातात. |

कलम **4 (1) (**ख) (सात)

**<u>जिल्हाधिकारी नांदेड येथील संजय गांधी योजना</u>** येथील कार्यालयाच्या परिनामकारक कामासाठी जनसामान्यांशी सल्ला मसलत करण्याची व्यवस्था

| अ.क्र. | सल्ला मसलतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियमा/ नियमा/परिपत्रकाद्वारे | पुररावृत्तीकाल |
|---|---|---|---|---|
| - | - | निरंक | - | - |

टिप :- कलम 4 (1) (ख) (सात) अंतर्गत प्रत्येक लोकप्राधिकारी संस्थेने अधिनियम / नियम /परिपत्रक इत्यादि अंतीम करण्यापूर्वी / राबवताना जनतेची मते / अपेक्षा जाणून घेण्यासाठी अस्थित्वात असलेल्या कार्यपध्दतीची माहिति देणे अपेक्षित आहे.

अनेक वेळा समितीची स्थापना करुन शिबिराद्वारे, ग्रामसभेद्वारे, जनसुनवाई अथवा कर्मचा-यांच्या दरबारातून जनमताची चाचपणी करण्यात येते.

कलम **4 (1) (**ख) (आठ)  नमुना (अ)

**<u>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील संजय गांधी योजना</u>** कार्यालयाच्या समितीची यादी प्रकाशित करणे.

| अ. क्र. | समितीचे नाव | समितीचे सदस्य (शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे शासन निर्णय क्रं. विसयो-**2015**/प्र.क्रं.**275**/ विसयो-**2** दिनांक-**05**-जानेवारी-**2016** नुसार) | | | समितीचे उद्दिष्ट | सभा किती वेळा घेण्यात येते | सभा जन-सामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही. | सभेचा कार्यवृतांत (उपलब्ध ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| - | संजय गांधी योजना समिती | 1 | मा. पालकमंत्री यांनी शिफारस केलेली संबधित तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्ती | अध्यक्ष | लाभार्थीची निवड करण्यासाठी | तीन महिन्यांतून एकदा | नाही | होतो. सभा तालुका पातळीवर घेतली जाते. |
| | | 2 | सदस्य ( मागासवर्गीय अनु,जाती/ अनु.जमाती अशासकिय प्रतिनिधी) (एक) (याच जातीमधील अपंगांना प्राधान्य) | सदस्य | | | | |
| | | 3 | सदस्य ( महिला -अशासकिय प्रतिनिधी) (एक) (याच प्रवर्गातील अपंगांना प्राधान्य) | सदस्य | | | | |
| | | 4 | सदस्य (इतर मागासवर्गीय/ वि.ज.भ.ज. प्रवर्गातील अशासकिय प्रतिनिधी) (दोन) (याच जातीमधील अपंगांना प्राधान्य) | सदस्य | | | | |
| | | 5 | सदस्य (सर्वसाधारण प्रवर्गातील -अशासकिय प्रतिनिधी) (एक) (याच प्रवर्गातील अपंगांना प्राधान्य) | सदस्य | | | | |
| | | 6 | सदस्य अपंग प्रवर्गातील अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य | | | | |
| | | 7 | सदस्य संबधीत तालुकयातील शासन नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेचा अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य | | | | |
| | | 8 | संबधीत तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्ती, अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य | | | | |
| | | 9 | संबधीत तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक, अशासकीय सदस्य (एक) | सदस्य | | | | |
| | | 10 | सदस्य (शासकिय प्रतिनिधी) | सदस्य | | | | |
| | | 11 | सदस्य सचिव (शासकिय प्रतिनिधी) | सदस्य | | | | |

कलम **4 (1) (**ख) (आठ)  नमुना (ब)

**<u>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड</u>** येथील संजय गांधी योजना कार्यालयाच्या अधिसभांची यादी प्रकाशित करणे.

| अ. क्र. | अधिसभेचे नाव | सभेचे सदस्य | सभेचे उद्दीष्ट | सभा किती वेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही. | सभेचा कार्यवृतांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| - | - | - | निरंक | - | - | - |

कलम **4 (1) (**ख) (नउु)

**<u>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील संजय गांधी योजना शाखा</u>** कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची नावे, पत्ते व त्यांचे मासिक वेतन करणे.

| अ. | पदनाम | अधिकारी /कर्मचा-याचे नाव | वर्ग | रुजू दिनांक | दुरध्वनी क्र./फॅक्स/ ई-मेल | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | तहसिलदार | श्री अशोक पौलस त्रिभुवन | वर्ग- 1 | 24/03/2014 | 8308434099 | 50,206/- |
| 2 | लिपीक (संगायो) | श्री. बालाजी दिगांबर बंगरवार | वर्ग- 3 | 16/06/2013 | 9405378521 | 23,077/- |
| 3 | शिपाई (संगायो) | श्री. मारोती माधवराव राउुत | वर्ग- 4 | 13/06/2011 | 9970760497 | 15,401/- |

टिप :- 1) हे प्रकाशन प्रत्येक वर्षाला करावे लागते.

2) महत्वाचे बदल तातडीने प्रकाशित केले पाहिजेत. उदा. प्रमुखांची बदली इत्यादि.

कलम **4 (1) (**ख) (दहा)

**<u>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील संजय गांधी योजना</u>** कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचा-यांची वेतनाची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

| अ. क्र. | वर्ग | वेतन रुपरेषा | इतर अनुज्ञेय भत्ते | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नियमित वेतन बॅण्ड मधील वेतन ( ग्रेड पे**,** महागाई भत्ता**,** घरभाडे भत्ता**,** वहान भत्ता**,**शहर भत्ता**,** धुलाई भत्ता) | प्रसंगानुसार (जसे प्रवास भत्ता ) | विशेष (जसे प्रकल्प भत्ता**,** प्रशिक्षण भत्ता |
| 1 | वर्ग- 1 | पीबी-3, 15600-39100<br>ग्रेड वेतन - 5000 | महागाई भत्ता - **119**%<br>घर भाडे भत्ता - **10**%<br>वाहन भत्ता - रूपये **600/-** | - | - |
| 2 | वर्ग - 3 | पीबी-1, 5200-20200<br>ग्रेड वेतन - 1900 | महागाई भत्ता - **119**%<br>घर भाडे भत्ता - **10**%<br>वाहन भत्ता - रूपये **400/-** | - | - |
| 3 | वर्ग- 4 | 1एस, 4440-7440<br>ग्रेड वेतन - 1300 | महागाई भत्ता - **119**%<br>घर भाडे भत्ता - **10**%<br>वाहन भत्ता - रूपये **400/-**<br>धुलाई भत्ता- रूपये **-50-** | - | - |

कलम **4 (1) (**ख) (अकरा)

**<u>जिल्हाधिकारी नांदेड येथील संजय गांधी योजना </u>**कार्यालयाचे मंजूर अंदाजपत्रक व खर्चाचा तपशिल याची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

अंदाज पत्रकाच्या प्रतीचे प्रकाशन. / अनुदानाच्या वितरणाच्या प्रतीचे प्रकाशन.

| अ. क्र. | अंदाजपत्रकिय शिर्षाचे वर्णन | अनुदान (मंजूर) | नियोजीत वापर (क्षेत्र व कामाचा तपशील) (खर्च) | अधिक अनुदान अपेक्षित असल्यास सुधारीतरुपात अर्थसंकल्पीय अंदाज **201**4-15 | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मागणी क्रमांक –एन्-2,<br>093 जिल्हा प्रशासन,<br>(01) (02) 2053 1169<br>संजय गांधी योजना आस्थापना | सन- 2014-15 | तालुकावार खर्च करणेत आली. | **201**4-15 | - |
| i | वेतन (01) | 7650,000/- | खर्च करणेत आली. तालुकावार वाटप केले | 0 | रिक्त पदांची तरतुद वगळून |
| ii | प्रवास खर्च (03) | 85,000/- | खर्च करणेत आली. तालुकावार वाटप केले | 0 | - |
| iii | कार्यालयीन खर्च (05) | 125,000/- | खर्च करणेत आली. तालुकावार वाटप केले | 0 | - |
| 2 | मागणी क्रमांक –एन्-2,094- जिल्हा प्रशासन, 2053 1178<br>इंदिरा गांधी निराधार योजना आस्थापना | सन- 2014-15 | तालुकावार खर्च करणेत आली. | **201**4-15 | - |
| i | वेतन | 4341,086 | खर्च करणेत आली. तालुकावार वाटप केले | 0 | रिक्त पदांची तरतुद वगळून |
| ii | प्रवास खर्च | 5,000/- | खर्च करणेत आली. तालुकावार वाटप केले | 0 | - |
| iii | कार्यालयीन खर्च | 28,300/- | खर्च करणेत आली. तालुकावार वाटप केले | 0 | - |
| 3 | संजय गांधी निराधार अनुदान योजना | 95560,000/- | तालुकावार वाटप केले | 0 | - |
| 4 | श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना | 87370,000/- | तालुकावार वाटप केले | 0 | - |
| 5 | इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना | 30376,000/- | तालुकावार वाटप केले | 0 | - |
| 6 | इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना | 178,000/- | तालुकावार वाटप केले | 0 | |
| 7 | इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना | 24,000/- | तालुकावार वाटप केले | 0 | |
| 8 | राष्ट्रीय कुटूंब लाभ योजना | 684,000/- | तालुकावार वाटप केले | 0 | - |

टिप :- प्रत्येक कार्यालय वरील माहिती कोणत्या ना कोणत्या प्रारुपानुसार तयार करत असते, असे प्रारुप त्यांना वापरता येईल.

कलम **4 (1) (**ख) (बारा)

<u>**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील संजय गांधी योजना**</u> कार्यालयातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपध्दती सन **2015-16** या वर्षासाठी प्रकाशीत करणे.

1) कार्यक्रमाचे नाव :- संजय गांधी योजनांतर्गत केंद्र शासन पुरस्कृत योजना व राज्य शासन पुरस्कृत योजना.
2) लाभार्थींच्या पात्रता संबंधीच्या अटी व शर्ती :- सदरची माहिती खालीलप्रमाणे आहे.
3) लाभ मिळवण्यासाठीच्या अटी :- सदरची माहिती खालीलप्रमाणे आहे.
4) लाभ मिळविण्यासाठीची कार्यपध्दती :- सदरची माहिती खालीलप्रमाणे आहे.
5) पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र :- लाभार्थी उत्पन्नाचा दाखला,दारिद्रयरेषेखाली असल्यास दाखला, रहिवाशी असल्याचा पुरावा, रेशनकार्ड झेरॉक्स प्रत, नमुन्यांतील अर्ज, तलाठी, ग्रामसेवक यांचे दाखले, वयाचा सक्षम अधिका-यांचा दाखला आवश्यक, अपंगत्वाबाबत वैद्यकिय अधिकारी यांचा दाखला आवश्यक.
6) कार्यक्रमामध्ये मिळणा-या लाभाची विस्तृत माहिती :- सदरची माहिती तालुका पातळीवर उपलब्ध आहे.
7) अनुदान वाटपाची कार्यपध्दती :- शासनाकडून आलेले अनुदान जिल्हास्तरावर तालुकावार लाभार्थीप्रमाणे वितरीत केले जाते.
8) सक्षम अधिका-याचे पदनाम :- तहसिलदार
9) विनंती अर्जासोबत लागणारे शुल्क :- नाही
10) इतर शुल्क :- नाही
11) विनंती अर्जाचा नमुना :- सदर नमुना तालुक्यांकडे उपलब्ध ठेवणेंत आला आहे.
12) सोबत जोडणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी (दस्ताऐवज/दाखले) :- तालुक्यांकडे उपलब्ध आहे.
13) जोड कागदपत्रांचा नमुना :- निरंक
14) कार्यपध्दती संदर्भात तक्रार निवारणासाठी संबंधीत अधिका-याचे पदनाम.
    (उदा. जिल्हा पातळी, तालुका पातळी, गाव पातळी)
15) लाभार्थींची यादी खालील नमुन्यात - लाभार्थींची यादी तालुकापातळीवर उपलब्ध आहे.

**1)** संजय गांधी निराधार अनुदान योजना :-

राज्य शासनाच्या या योजनेमध्ये 65 वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, अपंगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजाराने स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा (आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवांसह), घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतू पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला या सर्वांना लाभ मिळेल.

**1)** सदर योजनेसाठी पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र :-

1) विहीत नमून्यातील अर्ज (अर्ज संबंधीत तहसिलदार कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.)
2) तलाठी यांचेकडील रहिवाशी असलेबाबत, कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी किंवा निवासगृहाचा आंतरवासी नसल्याबाबतचा दाखला
3) लाभार्थीचा तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला, दारिद्रयरेषेखाली असल्यास ग्रामसेवक/गट विकास अधिकारी यांचेकडील दाखला, रेशनकार्ड झेरॉक्स प्रत,
4) वयाबाबत जन्म दाखला अगर सक्षम वैद्यकिय अधिका-यांचा दाखला आवश्यक, रोगाबाबत व अपंगत्वाबाबत जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडील वैद्यकिय प्रमाणपत्र आवश्यक राहील
5) मुलांचे वयाबाबत दाखले

6) पतीचा मृत्यू दाखला
7) अनाथ असलेबाबत ग्रामसेवक/मुख्याधिकारी/प्रभाग अधिकारी यांनी दिलेला व गटविकास अधिकारी / प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी साक्षांकित केलेला दाखला.
8) अर्जदाराचे दोन फोटो

सदर योजनेमध्ये मिळणा-या लाभाची विस्तृत माहिती :-

राज्य शासनाच्या या योजनेमध्ये 18 ते 64 वयोगटातील निराधार स्त्री/पुरुषांना लाभ मिळतो. सदर योजनेमध्ये एक व्यक्ती निराधार कुटूंबाला राज्य सरकारकडून दरमहा रुपये 600/- एकापेक्षा जास्त लाभार्थी निराधार कुटूंबाला दरमहा रूपये 900/- इतके अनुदान मिळते. या योजनेसाठी त्याचे उत्पन्न केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मर्यादेतच म्हणजे वार्षिक उत्पन्न रुपये 21,000/- पर्यंत असणे आवश्यक आहे. तसा दाखला देणे जरुरीचे आहे. तसेच सदर योजनेचा मिळणारा लाभ हा लाभार्थ्यीची मूले 25 वर्षांची झालेनंतर बंद केला जातो. लाभार्थ्यास मुलगी असल्यास अनुदान बंद केले जात नाही.

सदर योजनेकडील अपंग लाभार्थी जे दारीद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत आहेत व जे 18 ते 64 वयोगटातील आहेत तसेच ज्यांचे अपंगत्व 80 टक्के पेक्षा जास्त आहे अथवा त्यांना बहू विध अपंगत्व आहे त्यांना मिळणा-या रुपये 600/- अथवा रुपये 900/- इतक्या अनुदानापैकी रुपये 200/- इतके अनुदान केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजनेमधून मिळते व उर्वरित अनुदान सदर योजनेमधून मिळते. तसेच सदर योजनेकडील दारीद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत नाव असलेल्या 40 ते 64 वयोगटातील ज्या विधवा स्त्री लाभार्थी आहेत त्यांना मिळणा-या रुपये 600/- अथवा रुपये 900/- इतक्या अनुदानापैकी रुपये 200/- इतके अनुदान केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनेमधून मिळते व उर्वरित अनुदान सदर योजनेमधून मिळते.

**2)** श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना :–

राज्य शासनाच्या या योजनेमध्ये 65 व 65 वर्षांवरील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार स्त्री व पुरुषांना रुपये 400/- प्रतिमहा प्रतिलाभार्थी निवृत्ती वेतन राज्य शासनाकडून देणेत येईल. व अशा लाभार्थ्यांना केंद्र सरकारकडून इंदिरा गांधी राष्ट्रीय वृदापकाळ निवृत्ती वेतन योजनेतून रुपये 200/- दरमहा असे एकूण रुपये 600/- अनुदान प्रति लाभार्थी मिळते. पण लाभार्थी दारिद्रय रेषेखालील नसेल व सदर योजनेच्या इतर सर्व अटिंची पूर्तता करीत असेल व त्यांचे उत्पन्न केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मर्यादेतच म्हणजे वार्षिक उत्पन्न रुपये 21,000/- पर्यंत असेल तर त्यास फक्त राज्य सरकारकारच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेमधूनच रुपये 600/- इतके अनुदान मिळते. सदर योजनेकडे संजय गांधी निराधार योजनेकडील वयाची 64 वर्षे पूर्ण केलेले लाभार्थी वर्ग केले जातात. त्यामध्ये ज्यांचे नाव दारिद्रयरेषेखालील यादीत आहे अशा लाभार्थ्यांना या योजनेतून दरमहा रुपये 400/- व केंद्र सरकारच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजनेमधून दरमहा रुपये 200/- असे दरमहा एकूण रुपये 600/- अनुदान मिळते. पण ज्यांचे नाव दारिद्रयरेषेखालील यादीमध्ये नाही व त्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये 21,000/- पेक्षा कमी आहे, अशा लाभार्थ्यांना फक्त राज्य सरकारच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेमधूनच दरमहा रुपये 600/- इतके अनुदान मिळते. त्यास केंद्र सरकारच्या योजनेचा लाभ मिळत नाही.

**1)** सदर योजनेसाठी पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र :-
2) विहीत नमून्यातील अर्ज (अर्ज संबंधीत तहसिलदार कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.)
3) तलाठी यांचेकडील रहिवाशी असलेबाबत, कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी किंवा निवासगृहाचा आंतरवासी नसल्याबाबत दाखला
4) लाभार्थीचा तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला, दारिद्रयरेषेखाली असल्यास ग्रामसेवक/गट विकास अधिकारी यांचेकडील दाखला, रेशनकार्ड झेरॉक्स प्रत,
5) वयाबाबत जन्म दाखला अगर सक्षम वैद्यकिय अधिका-यांचा दाखला आवश्यक.
6) अर्जदाराचे दोन फोटो

**3)** इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना :–

केंद्र शासनाच्या या योजनेमध्ये 18 ते 64 वयोगटातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार अपंग स्त्री व पुरुषांना ज्यांना 80 टक्के पेक्षा जास्त अपंगत्व आहे अथवा बहू विध अपंगत्व आहे. त्यांना सदर योजनेमधून रुपये 200/- प्रतिमहा अनुदान मिळते. सदर लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून एका कुटूंबात एक लाभार्थी असल्यास रुपये 400/- व एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास रुपये 700/- इतके अनुदान मिळते.

**1)** सदर योजनेसाठी पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र :-

सदर योजनेसाठीची पात्रता ठरविणेसाठी आवश्यक कागदपत्रे संजय गांधी निराधार अनुदान योजनेप्रमाणे आवश्यक आहेत.

**4)** इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना :–

केंद्र शासनाच्या या योजनेमध्ये 40 ते 64 वयोगटातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार विधवांना सदर योजनेमधून रुपये 200/- प्रतिमहा अनुदान मिळते. सदर लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून एका कुटूंबात एक लाभार्थी असल्यास रुपये 400/- व एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास रुपये 700/- इतके अनुदान मिळते.

**1)** सदर योजनेसाठी पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र :-

सदर योजनेसाठीची पात्रता ठरविणेसाठी आवश्यक कागदपत्रे संजय गांधी निराधार अनुदान योजनेप्रमाणे आवश्यक आहेत.

**5)** इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना :–

केंद्र शासनाच्या या योजनेमध्ये 65 व 65 वर्षांवरील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार स्त्री व पुरुषांना रुपये 200/- प्रतिमहा प्रतिलाभार्थी निवृत्ती वेतन केंद्र शासनाकडून देणेत येईल. व अशा लाभार्थ्यांना राज्य सरकारकडून श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेमधून दरमहा रुपये 400/- असे एकूण रुपये 600/- अनुदान मिळते. सदर योजनेकडे संजय गांधी निराधार योजनेकडील वयाची 64 वर्षे पूर्ण केलेले फक्त दारिद्रयरेषेखालील कुटूंबाच्या यादीमध्ये नाव असणारेच लाभार्थी वर्ग केले जातात

**1)** सदर योजनेसाठी पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र :-

1) विहीत नमून्यातील अर्ज (अर्ज संबंधीत तहसिलदार कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.)
2) तलाठी यांचेकडील रहिवाशी असलेबाबत, कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी किंवा निवासगृहाचा आंतरवासी नसल्याबाबत दाखला
3) लाभार्थी दारिद्रयरेषेखाली असल्याबाबतचा ग्रामसेवक/गट विकास अधिकारी यांचेकडील दाखला, रेशनकार्ड झेरॉक्स प्रत,
4) वयाबाबत जन्म दाखला अगर सक्षम वैद्यकिय अधिका-यांचा दाखला आवश्यक.
5) अर्जदाराचे दोन फोटो

**6)** राष्ट्रीय कुटूंब लाभ योजना :–

केंद्र शासनाच्या या योजनेमध्ये दारीद्रय देषेखालील कुटूंबातील वय वर्षे 18 ते 64 वयोगटातील कमवत्या/कर्त्या कुटूंब प्रमुखाचा नैसर्गीक अथवा अपघाती मृत्यू झाल्यास त्या कुटूंबातील जीवीत कुटूंब प्रमुखास रुपये 20,000/- इतके अनुदान केंद्र सरकारकडून मिळते. सदर योजनेसाठी मयत व्यक्ती ही त्या कुटूंबातील

कमवती/कर्ती कुटूंब प्रमुख असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार व्यक्ती ही त्या कुटूंबातील जीवीत कुटूंब प्रमुख असणे आवश्यक राहील.

**1)** सदर योजनेसाठी पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र :-

1) विहीत नमून्यातील अर्ज (अर्ज संबंधीत तहसिलदार कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.)
2) तलाठी यांचेकडील रहिवाशी असलेबाबत, कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी किंवा निवासगृहाचा आंतरवासी नसल्याबाबत दाखला
3) लाभार्थी दारिद्रयरेषेखाली असल्याबाबतचा दाखला, रेशनकार्ड झेरॉक्स प्रत,
4) मयत व्यक्ती कुटूंब प्रमुख/मिळवती व्यक्ती होती याबाबतचा तलाठी यांनी दिलेला दाखला
5) मयत व्यक्तीचा मृत्यूचा दाखला
6) मयत व्यक्तीचा वयाबाबतचा जन्म दाखला
7) अर्जदाराचे दोन फोटो

**7)** केंद्र शासनाची आम आदमी बिमा योजना :-

1) ग्रामीण भागातील 2.5 एकर पेक्षा कमी बागायती व 5 एकर पेक्षा कमी जिरायती शेत जमीन धारण करणा-या कुटूंबातील 18 ते 59 वयोगटातील कुटूंब प्रमुख किंवा त्या कुटूंबातील एक मिळवती व्यक्ती सदर योजनेस पात्र राहील
2) या योजनेंतर्गत भारतीय आयुर्विमा महामंडळाला द्यावयाच्या विम्याचा हप्ता वार्षिक असून विम्याच्या हप्त्याची रक्कम प्रति सदस्य 200/- रुपये राहील. यापैकी 50 टक्के रक्कम म्हणजेच 100/- रुपये केंद्र शासनामार्फत आम आदमी बिमा योजना सामाजिक सुरक्षा निधीतून देण्यात येईल. उर्वरित 50 टक्के रक्कम म्हणजेच 100/- रुपये राज्य शासन देईल. लाभार्थ्यांवर विमा हप्त्याचा कोणताही आर्थिक भार पडणार नाही.
3) सदर योजनेंतर्गत मिळणारी भरपाईची रक्कम - अ) विम्याच्या अंतिम मुदतीपूर्वी सदस्याचा मृत्यू झाल्यास भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून वारसाला आश्वासित रक्कम रूपये 30,000/- भरपाई मिळेल. ब) सदस्याचा अपघाती मृत्यू झाल्यास रुपये 75,000/- किंवा अपघातामुळे कायमचे अपंगत्व आल्यास किंवा दोन्ही डोळे व दोन्ही पाय निकामी झाल्यास रुपये 75,000/- किंवा अपघातामुळे एक डोळा किंवा एक पाय निकामी झाल्यास रुपये 37,500/- भरपाई मिळेल.
4) शैक्षणिक लाभ - सदस्याच्या इयत्ता 9 वी ते 12 मध्ये शिकणा-या 2 मुलांना भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून प्रति तिमाही प्रति मुलास रुपये 300/- शिष्यवृत्ती मिळेल.
5) या योजनेंतर्गत सदस्य झालेल्या व्यक्तीला राज्य शासनाकडून राबविल्या जाणा-या अन्य विमा योजनांचा लाभ मिळणार नाही.

**1)** सदर योजनेसाठी पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र :-

1) विमा योजनेसाठी नमूना क मधील अर्ज व शिष्यवृत्तीसाठी नमूना ड मधील (इंग्रजी नमूना) अर्ज
   (सदर दोन्ही अर्ज संबंधीत तहसिलदार कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.)
2) रेशन कार्ड झेरॉक्स प्रत
3) वयाबाबत जन्म दाखला/वैद्यकिय प्रमाणपत्र/निवडणूक ओळखपत्र अगर रेशन झेरॉक्स प्रत.

सदर योजना राबविणारे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकारी व कार्यालयाचा पत्ता

**1)** जिल्हास्तर :- सदर योजना राबविणेकामी जिल्हास्तरावर अपर जिल्हाधिकारी हे संनियंत्रण अधिकारी आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील संजय गांधी योजना शाखेमार्फत सदर योजनांचे कामकाज चालते.

**2)** तालुकास्तरावर :- संबंधीत तालुक्याचे तहसिलदार/संजय गांधी योजना नायब तहसिलदार हे संनियंत्रण अधिकारी आहेत. संबंधीत तालुक्याच्या तहसिलदार कार्यालयामधील संजय गांधी योजना शाखेमार्फत सदर योजनांचे कामकाज चालते.

कलम **4 (1) (**ख) (सतरा)

<u>**जिल्हाधिकारी नांदेड येथील संजय गांधी योजना**</u> कार्यालयातील अनुदान कार्यक्रमाअंतर्गत लाभार्थींची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

योजना/कार्यक्रमाचे नाव :- संजय गांधी योजनांतर्गत सन **2** साली खर्च केलेले अनुदान.

| अ. क्र. | लाभार्थींचे नाव व पत्ता | अनुदान/लाभ याची रक्कम | निवड पात्रतेचे निकष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा स्तरावरील एकूण लाभार्थी (मार्च-2015 अखेर)<br>1) संजय गांधी निराधार अनुदान योजना लाभार्थी – 18814<br><br>2) श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना लाभार्थी – 30112<br><br>3) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना लाभार्थी – 22535<br><br>4) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना लाभार्थी – 237<br><br>5) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना लाभार्थी – 18<br><br>5) राष्ट्रीय कुटूंब लाभ योजना लाभार्थी - रु.10,000 प्रमाणे-64<br>रु.20,000 <u>प्रमाणे-398</u><br>एकुण-459 | <br><br>14,03,55,700/-<br><br><br>15,58,05,000/-<br><br><br>5,24,68,400 /-<br><br><br><br>4,50,400/-<br><br><br><br>41,400/-<br><br><br><br>81,40,000/- | कलम 4 (1) (ब) (12) नमुना अ प्रमाणे | |

टिप :- विविध योजनांसाठी कार्यक्रमाअंतर्गत वेगवेगळी यादी प्रकाशित करणे आवश्यक आहे.